शिक्षण विभाग (प्राथमिक),जिल्हा परिषद **अमरावती**

******************************************************************************************

## पेसा क्षेत्रातील कंत्राटी शिक्षक पद भरती प्रक्रियेकरिता अनुसूचित जमाती व अन्य इतर प्रवर्गातील शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांकरिता अटी व शर्ती

**उमेदवारांची शैक्षणिक व व्यावसायीक अर्हता:-**

**१) इ. १ ली ते ५ वी, ६ वी ते ८ वी, ९ वी ते १० वी व ११ वी ते १२ वी यासाठी शैक्षणीक व व्यावसायीक अर्हता शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१८/प्र.क्र.३९७/टीएनटी-१ दिनांक ७/२/२०१९, शुध्दीपत्रक दिनांक २५/२/२०१९ दि.१६ मे २०१९ व दि. १२/६/२०१९ दि. १०/११/२०२२ मध्ये नमुद केल्यानुसार राहील.**

**२) शिक्षक पात्रता परीक्षेबाबत शालेय शिक्षण विभागाचा शासन निर्णय १३/०२/२०१३, २३/०८/२०१३ दि.०१जानेवारी २०१९ शासन पत्र दिनांक २४/१०/२०१९ व ३०/६/२०२२ नुसार अर्हता आवश्यक आहे.**

i) **इ. १ ली ते ५ वी साठी शैक्षणिक व व्यावसायीक अर्हता**-उच्च् माध्यमीक उत्तीर्ण (खुल्या प्रवर्गासाठी-४५ टक्के गुणांसह व मागासवर्गीय प्रवर्गासठी -४० टक्के गुणांसह) व व्यावसायीक अर्हता –D.Ed/ D.El.ED/ D.T.Ed/D.Ed (Spl.Education)/T.C.H./TET-Paper -१ किंवा CTET- Paper -१ उत्तीर्ण आवश्यक आहे.

ii) इयत्ता ६ वी ते ८ वी साठी शैक्षणीक व व्यावसायीक अर्हता-संबंधीत विषयातील पदवी (पदवीच्या अंतिम वर्षी खुल्या प्रवर्गासाठी -४५ टक्के गुणांसह व मागासर्गीय प्रवर्गासाठी-४० टक्के गुणांसह) व व्यावसायीक अर्हता D.Ed/ D.El.ED/ D.T.Ed/D.Ed (Spl.Education)/T.C.H./B.Ed./B.A. Ed./B.Sc.Ed. तसेच

**शिक्षक पात्रता परिक्षा**- पदवीच्या संबंधीत विषयामध्ये TET-Paper-२ किंवा CTET-Paper-२ खालील विषय गटासाठी त्यांच्या नावासमोर दर्शविलेली शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण आवश्यक आहे.

अ) गणित-विज्ञान, गणित, विज्ञान या विषयासाठी-**विज्ञान/गणित**

ब) इतिहास, भुगोल, सामाजिक शास्त्र इत्यादी विषयासाठी-**सामाजिक शास्त्र**

क) **भाषा विषयासाठी** –विज्ञान/गणित किंवा सामाजिक शास्त्र यापैकी कोणतीही.

3) **मासिक मानधन-** मानधन रुपये २०,०००/-प्रतीमाह (कोणतेही इतर लाभा व्यतिरिक्त )

४) जिल्हा परिषदेच्या वतीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याशी अर्जदारास **करारनामा स्वाक्षरीत करणे** आवश्यक राहील.

५) **बंधपत्र / हमीपत्र:** नियुक्तीच्या कालावधीत करार पद्धतीने शिक्षकीय पदाचे विहित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील, **या आशयाचे बंधपत्र / हमीपत्र देणे आवश्यक आहे.** या बंधपत्र / हमीपत्रामध्ये करार पद्धतीने नियुक्ती देतांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा तसेच कंत्राटी पद्धतीने नेमणूक करण्यात आलेल्या उमेदवारांकडून सदर पदांवर कायम करणेबाबत भविष्यात कोणत्याही प्रकारचा हक्क अथवा न्यायालयीन दावा करणार नसलेबाबत उल्लेख करणारे हमीपत्र / बांधपत्र लिहून देणे बंधनकारक असेल. **(सदरचे बंधपत्र / हमीपत्र रुपये १००/- स्टॅम्पपेपर देण्यात यावे.)**

६) अर्जदार/उमेदवारांवर **कोणत्याही प्रकारचा गुन्हा व आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र** स्वतंत्रपणे सादर करावे.

७) जाहिरातीमध्ये नमूद करण्यात आलेली **नियुक्ती नियमित शिक्षक उपलब्ध होईपर्यंतच असेल.**

८) अर्जदार/उमेदवारांनी **विहित नमुन्यात अलीकडच्या काळातील साक्षांकित पासपोर्ट साईज फोटोसह आवश्यक कागदपत्रसह परिपूर्ण अर्ज (परिशिष्ट-क) सादर करावा.** अर्जाच्या पाकीटावर **कंत्राटी शिक्षक पदाकरिता अर्ज** असे स्पष्ट नमूद करावे.

९) पात्र व इच्छुक उमेदवारांनी आवेदन पत्र शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद अमरावती **या कार्यालयात दि. २० /०८/२०२४ रोजीपर्यंत सादर करावे. यानंतर आलेले आवेदन पत्र स्वीकारले जाणार नाहीत.**

**१०) शासनाद्वारे नियमित शिक्षक उपलब्ध झाल्यास कंत्राटी पद्धतीने शिक्षक पदी नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांना कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.**

(बुध्दभुषण सोनोने)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद अमरावती

(संजिता महापात्र भा. प्र. से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अमरावती

Scanned with OKEN Scanner